॥ श्री एकनाथमहाराजकृत हरिपाठाचे अभंग ॥

१

हरीचिया दासा हरि दाही दिशा । भावें जैसा तैसा हरि एक ॥ १ ॥
हरी मुखीं गातां हरपली चिंता । त्या नाहीं मागुता जन्म घेणें ॥ २ ॥
जन्म घेणें लागे वासनेच्या संगे । तेचि झालीं अंगें हरिरूप ॥ ३ ॥
हरिरूप झालें जाणीव हरपले । मीतूंपणा गेलें हरीचे ठायीं ॥ ४ ॥
हरिरूप ध्यानीं हरिरूप मनीं । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५ ॥

२

हरि बोला हरि बोला नातरी अबोला । व्यर्थ गलबला करूं नका ॥ १ ॥
नको अभिमान नको नको मान । सोडीं मीतूंपण तोचि सुखी ॥ २ ॥
सुखी त्याणें व्हावें जगा निववावें । अज्ञानी लावावे सन्मार्गासी ॥ ३ ॥
मार्ग जया कळे भावभक्तिबळें । जगाचिये मेळे न दिसती ॥ ४ ॥
जनीं वनीं प्रत्यक्ष लोचनीं । एका जनार्दनीं ओळखिलें ॥ ५ ॥

३

ओळखिला हरी धन्य तो संसारी । मोक्ष त्याचे घरीं सिद्धीसहित ॥ १ ॥
सिद्धी लावी पिसें कोण तया पुसे । नेलें राजहंसें पाणी काय ॥ २ ॥
काय तें करावें संदेहीं निर्गुण । ज्ञानानें सगुण ओस केलें ॥ ३ ॥
केलें कर्म झालें तेंचि भोगा आलें । उपजले मेले ऐसे किती ॥ ४ ॥
एका जनार्दनीं नाहीं यातायाती । सुखाची विश्रांती हरीसंगें ॥ ५ ॥

४

जें जें दृष्टी दिसे तें तें हरिरूप । पूजा ध्यान जप त्यासी नाहीं ॥ १ ॥
वैकुंठ कैलासी तीर्थक्षेत्रीं देव । तयाविण ठाव रिता कोठें ॥ २ ॥
वैष्णवांचें गुह्य मोक्षांचा एकांत । अनंतासी अंत पाहतां नाहीं ॥ ३ ॥
आदि मध्य अवघा हरि एक । एकाचे अनेक हरि करी ॥ ४ ॥
एकाकार झाले जीव दोन्ही तिन्ही । एका जनार्दनीं ऐसें केलें ॥ ५ ॥

५

नामाविण मुख सर्पाचें तें बीळ । जिव्हा काळसर्प आहे ॥ १ ॥
वाचा नव्हे लांब जळो त्याचें जिणें । यातना भोगणें यमपुरीं ॥ २ ॥
हरीविण कोणी नाहीं सोडविता । पुत्र बंधु कांता संपत्तिचे ॥ ३ ॥
अंतकाळीं कोणी नाहीं बा सांगाती । साधूचे संगतीं हरी जोडे ॥ ४ ॥
कोटि कुळें तारी हरि अक्षरें दोन्ही । एका जनार्दनीं पाठ केलीं ॥ ५ ॥

६

धन्य माय व्याली सुकृताचें फळ । फळ निर्फळ हरीविण ॥ १ ॥

वेदांताचें बीज हरि हरि अक्षरें । पवित्र सोपारें हेंचि एक ॥ २॥
योग याग व्रत नेम दानधर्म । नलगे साधन जपतां हरि ॥ ३॥
साधनाचें सार नाम मुखीं गातां । हरि हरि म्हणतां कार्यसिद्धी ॥ ४॥
नित्य मुक्त तोचि एक ब्रह्मज्ञानी । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५॥

७

बहुतां सुकृतें नरदेह लाधला । भक्तीविण गेला अधोगती ॥ १॥
पाप भाग्य कैसे न सरेचि कर्म । न कळेचि वर्म अरे मूढा ॥ २॥
अनंत जन्मींचें सुकृत पदरीं । त्याचे मुखीं हरि पैठा होय ॥ ३॥
राव रंक हो कां उंच नीच याती । भक्तीविण माती मुखीं त्याच्या ॥ ४॥
एका जनार्दनीं हरि हरि म्हणतां । मुक्ती सायुज्यता पाठी लागे ॥ ५॥

८

हरिनामामृत सेवी सावकाश । मोक्ष त्याचे भूस दृष्टीपुढें ॥ १॥
नित्य नामघोष जयाचे मंदिरीं । तेचि काशीपुरी तीर्थक्षेत्र ॥ २॥
वाराणसी तीर्थक्षेत्रा नाश आहे । अविनाशासी पाहे नाश कैचा ॥ ३॥
एका तासामाजीं कोटि वेळा सृष्टी । होती जाती दृष्टि पाहें तोचि ॥ ४॥
एका जनार्दनीं ऐसें किती झालें । हरिनाम सेविलें तोचि एक ॥ ५॥

९

भक्तीविण पशु कशासी वाढला । सटवीने नेला कैसा नाहीं ॥ १॥
काय माय गेली होती भूतापासीं । हरि न ये मुखासी अरे मूढा ॥ २॥
पातकें करिता पुढें आहे पुसता । काय उत्तर देतां होशील तूं ॥ ३॥
अनेक यातना यम करवील । कोण सोडवील तेथें तुजला ॥ ४॥
एका जनार्दनीं सांगताहें तोंदें । आहा वाचा रडे बोलतांचि ॥ ५॥

१०

स्वहिताकारणें संगती साधूची । भावें भक्ति हरीची भेटी तेणें ॥ १॥
हरि तेथें संत संत तेथें हरी । ऐसें वेद चारी बोलताती ॥ २॥
ब्रह्मा डोळसातें वेदार्थ ना कळे । तेथें हे आंधळे व्यर्थ होती ॥ ३॥
वेदार्थाचा गोंवा कन्याअभिलाष । वेदें नाहीं ऐसें सांगितलें ॥ ४॥
वेदांचीं हीं बीजाक्षरें हरी दोनी । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५॥

११

सत्पद तें ब्रह्म चित्पद तें माया । आनंदपदीं जया म्हणती हरी ॥ १॥
सत्पद निर्गुण चित्पद सगुण । सगुण निर्गुण हरिपायीं ॥ २॥
तत्सदिति ऐसें पैल वस्तूवरी । गीतेमाजी हरि बोलियेले ॥ ३॥
हरिपदप्राप्ती भोळ्या भाविकांसी । अभिमानियांसी नर्कवास ॥ ४॥
अस्ति भाति प्रिय ऐशीं पदें तिनी । एका जनार्दनीं तेंचि झालें ॥ ५॥

१२

नाकळे तें कळे कळे तें नाकळे । वळे तें ना वळें गुरुविणें ॥ १॥

निर्गुण पावलें सगुणीं भजतां । विकल्प धरितां जिव्हा झडे ॥ २॥
बहुरूपी घरी संन्यासाचा वेष । पाहोन तयास धन देती ॥ ३॥
संन्याशाला नाहीं बहुरूपियाला । सगुणीं भजला तेथें पावे ॥४॥
अद्वैताचा खेळ दिसे गुणागुणीं । एका जनार्दनीं ओळखिलें ॥ ५॥

१३

ओळखिला हरि सांठविला पोटीं । होतां त्याची भेटी दुःख कैंचें ॥ १॥
नर अथवा नारी हो कां दुराचारी । मुखीं गातां हरि पवित्र तो ॥ २॥
पवित्र तें कुळ धन्य त्याची माय । हरि मुखें गाय नित्य नेमें ॥ ३॥
काम क्रोध लोभ जयाचे अंतरीं । नाहीं अधिकारी ऐसा येथें ॥ ४॥
वैष्णवांचें गुह्य काढिलें निवडुनी । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५॥

१४

हरि बोला देतां हरि बोला घेतां । हांसतां खेळतां हरि बोला ॥ १॥
हरि बोला गातां हरि बोला खातां । सर्व कार्य करितां हरि बोला ॥ २॥
हरि बोला एकांतीं हरि बोला लोकांतीं । देहत्यागाअंतीं हरि बोला ॥ ३॥
हरि बोला भांडतां हरि बोला कांडतां । उठतां बैसतां हरि बोला ॥ ४॥
हरि बोला जनीं हरि बोला विजनीं । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५॥

१५

एक तीन पांच मेळा पञ्चवीसांच । छत्तिस तत्त्वांचा मूळ हरि ॥ १॥
कल्पना अविद्या तेणे झाला जीव । मायोपाधी शिव बोलिजेति ॥ २॥
जीव शिव दोन्ही हरिरूपीं तरंग । सिंधु तो अभंग नेणें हरी ॥ ३॥
शुक्तीवरी रजत पाहतां डोळां दिसे । रज्जूवरी भासे मिथ्या सर्प ॥ ४॥
क्षेत्र-क्षेत्रज्ञातें जाणताती ज्ञानी । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५॥

१६

कल्पनेपासूनी कल्पिला जो ठेवा । तेणें पडे गोंवा नेणे हरी ॥ १॥
दिधल्या वांचूनि फळप्राप्ति कैंची । इच्छा कल्पनेची व्यर्थ बापा ॥ २॥
इच्छावे ते जवळी चरण हरीचे । चरण सर्व नारायण देतो तुज ॥ ३॥
न सुटे कल्पना अभिमानाची गांठी । घेतां जन्म कोटी हरि कैंचा ॥ ४॥
एका जनार्दनीं सांपडली खूण । कल्पना अभिमान हरि झाला ॥ ५॥

१७

काय पद्मनीचे षंढासी सोहळे । वांझेसी दोहाळे कैची होती ॥ १॥
अंधापुढें दीप खरासी चंदन । सर्पासी दुधपान करूं नये ॥ २॥
क्रोधि अविश्वासी त्यासी बोध कैंचा । व्यर्थ आपुली वाचा शिणवूं नये ॥ ३॥
खळाची संगती उपयोगासी न ये । आपणा अपाय त्याचे संगे ॥ ४॥
वैष्णवीं कुपथ्य टाकिल वाळूनी । एका जनार्दनीं तेचि भले ॥ ५॥

१८

न जायेचि ताठा नित्य खटाटोप । मण्डुकीं वटवट तैसे ते गा ॥ १॥

प्रेमावीण भजन नाकाविण मोती । अर्थाविण पोथी वाचुनी काय ॥ २॥
कुंकवा नाहीं ठावे म्हणे मी आहेव । भावावीण देव कैसा पावे ॥ ३॥
अनुतापेवीण भाव कैसा राहे । अनुभवें पाहें शोधूनियां ॥ ४॥
पाहतां पाहणें गेलें तें शोधूनी । एका जनार्दनीं अनुभविलें ॥ ५॥

१९

परिमळ गेलिया वोस फुल देठीं । आयुष्या शेवटीं देह तैसा ॥ १॥
घडीघडी काळ वाट याची पाहे । अजून किती आहे अवकाश ॥ २॥
हाचि अनुताप घेऊन सावध । कांहीं तरी बोध करीं मना ॥ ३॥
एक तास उरला खट्वांग रायासी । भाग्यदशा कैसी प्राप्त झाली ॥ ४॥
सांपडला हरि तयाला साधनीं । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५॥

२०

करा रे बापांनो साधन हरीचें । झणीं करणीचें करूं नका ॥ १॥
जेणें बा न ये जन्म यमाची यातना । ऐशिया साधना करा कांहीं ॥ २॥
साधनाचें सार मंत्रबीज हरी । आत्मतत्त्व धरी तोचि एक ॥ ३॥
कोटि कोटि यज्ञ नित्य ज्याचा नेम । एक हरि नाम जपतां घडे ॥ ४॥
एका जनार्दनीं न घ्यावा संशय । निश्चयेंसी होय हरिरूप ॥ ५॥

२१

बारा सोळा जणी हरीसी नेणती । म्हणोनी फिरती रात्रंदिवस ॥ १॥
सहस्र मुखांचा वर्णितां भागला । हर्ष जया झाला तेणें सुखें ॥ २॥
वेद जाणूं गेला पुधें मौनावला । तें गुह्य तुजला प्राप्त कैंचें ॥ ३॥
पूर्व सुकृताचा पूर्ण अभ्यासाचा । दास सद्गुरूचा तोचि जाणे ॥ ४॥
जाणते नेणते हरीचे ठिकाणीं । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५॥

२२

पिंडीं देहस्थिती ब्रह्मांडीं पसारा । हरिविण सार व्यर्थ भ्रम ॥ १॥
शुकयाज्ञवल्क्य दत्त कपिलमुनी । हरिसी जाणोनि हरिच झाले ॥ २॥
या रे या रे धरूं हरिनाम तारूं । भवाचा सागरू भय नाहीं ॥ ३॥
साधुसंत गेले आनंदीं राहिले । हरिनामें झाले कृतकृत्य ॥ ४॥
एका जनार्दनीं मांडिलें दुकान । देतो मोलावीण सर्व वस्तु ॥ ५॥

२३

आवडीनें भावें हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥ १॥
नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा । पति तो लक्ष्मीचा जाणतसे ॥ २॥
सकळ जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसें नाहीं ॥ ३॥
जैसी स्थिति आहे तैशापरी राहें । कौतुक तूं पाहें संचिताचें ॥ ४॥
एका जनार्दनीं भोग प्रारब्धाचा । हरिकृपें त्याचा नाश झाला ॥ ५॥

२४

दुर्बळाची कन्या समर्थाने केली । अवदसा निमाली दरिद्राची ॥ १॥

हरिकृपा होतां भक्तां निघती दोंदें । नाचती स्वानंदें हरिरंगीं ॥ २॥
देव भक्त दोन्ही एकरूप झाले । मुळींच संचलें जैसें तैसें ॥ ३॥
पाजळली ज्योती कापुराची वाती । ओवाळितां आरती भेद नुरे ॥ ४॥
एका जनार्दनीं कल्पेंची मुराला । तोचि झाला ब्रह्मरूप ॥ ५॥

२५

मुद्रा ती पांचवी लावूनियां लक्ष । तो आत्मा प्रत्यक्ष हरि दिसे ॥ १॥
कानीं जें पेरिलें डोळां तें उगवलें । व्यापकें भारले तोचि हरि ॥ २॥
कर्म-उपासना-ज्ञानमार्गीं झाले । हरिपाठीं आले सर्व मार्ग ॥ ३॥
नित्य प्रेमभावें हरिपाठ गाय । हरिकृपा होय तयावरी ॥ ४॥
झाला हरिपाठ बोलणें येथूनी । एका जनार्दनीं हरि बोला ॥ ५॥

॥ इति श्री एकनाथ हरिपाठ समाप्त ॥

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 25, 1999